# प्रकरण पहिले

## प्रस्तावना

१.० दैनंदिन जीवनातील प्रसार माध्यमांचा संपर्क

१.१ शिक्षणातील प्रसार माध्यांमाची भूमिका

१.२ शिक्षकासाठी प्रसार माध्यांमाची उपयुक्तता

१.३ अध्ययनार्थीसाठी प्रसार माध्यांमाची उपयुक्तता

१.४ शालेय व्यवस्थापनासाठी प्रसार माध्यांमाची उपयुक्तता

१.५ दैनंदिन जीवनातील सवयी

१.६ अध्ययनार्थीच्या दैनंदिन जीवनातील अभ्यास सवयी

१.७ अभ्यास सवयीची वैशिष्ट्ये

१.८ प्रस्तुत संशोधनाची गरज

१.९ संशोधन समस्येचे शब्दांकन

१.१० प्रस्तुत संशोधन विषयातील संज्ञाचे स्पष्टीकरण

१.११ संशोधनाचे महत्त्व

१.१२ संशोधन विषयाची उद्दिष्टे

१.१३ संशोधनाची गृहितके

१.१४ परिकल्पना

१.१५ संशोधन विषयाच्या मर्यादा

१.१६ प्रकरणीकरण

१.१७ समारोप

# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक :

### १.० दैनंदिन जीवनातील प्रसार माध्यमांचा संपर्क :

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. आपल्या सभोवताली घडणा-या घटना आपल्याला प्रसार माध्यमामुळे समजतात. प्रसार माध्यमे ही समाज परिवर्तनाची महत्वाची साधने आहेत. दैनंदिन जीवनात व्यक्तीला प्रसार माध्यमांची फार मोठी आवश्यकता भासते.पूर्वीच्या काळी प्रसार माध्यमांचे प्रमाण फारच कमी असल्याने फारच अडचणी भासत होत्या. एक समाज दुस-या समाजापासून दूरवर राहत असल्याने आणि प्रसार माध्यमांचा संपर्क कमी असल्याने त्या समाजातील दरी आणखीनच वाढत होती पण प्रसार माध्यमांच्यात होणारी वाढ ही समाजा-समाजातील आणि देशा-देशातील अंतर कमी करण्यास मदत करणारी ठरलेली आहे.

दैनंदिन जीवनात व्यक्तींना असंख्य गरजांना सामोरे जावे लागत आहे. या गरजा भागविण्यासाठी प्रसार माध्यमे उपयोगी पडतात. घरी बसल्या जागेवर दूरचित्रवाणी,रेडिओ,वृत्तपत्रे,मासिके आणि इतर प्रसार माध्यमांच्या साहाय्याने माहिती मिळविता येते.वैद्यकीय क्षेत्रात असणा-या समस्यांना तोंड देण्यासाठी इंटरनेटसारखी प्रसार माध्यमे प्रभावीरितीने काम करताना दिसतात.

सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे प्रसार माध्यम हे एक प्रबळ साधन आहे. प्रसार माध्यमांशिवाय सामाजिक गतिशीलता वाढू शकत नाही. पूर्वीच्या समाजाची गतिशीलता फारच कमी होती. संस्कृतीसंक्रमणाचे काम प्रसार माध्यमातून होते. दूरचित्रवाणीवरील किंवा रेडिओवरील कार्यक्रमाच्या साहाय्याने पूर्वीच्या संस्कृतीचे संक्रमण होते उदा.पाहायचे झाल्यास रेडिओवरील कार्यक्रम गीतरामायण किंवा दूरदर्शनवरील महाभारत,रामायण इत्यादी कार्यक्रमामुळे संस्कृतीसंक्रमणाचे कार्य होऊ लागले. प्रसार माध्यमातील क्रांती सामाजिक

परिवर्तनास मदत करते.

(एकीकडे प्रसार माध्यमांचा चांगला उपयोग होत आहे. उपयुक्त माहितीसाठीच प्रसार माध्यमांचा उदय झाला असला तरी त्यापासून काही अडचणीही निर्माण होत आहेत. प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तीमत्व भिन्न आहे. चांगल्या वृत्ती जशा आहेत तशाच वाईट वृत्ती ही व्यक्तीच्या अंगी असते,आणि अशा वाईट प्रवृत्तीमुळेच प्रसार माध्यमांचा वाईट परिणाम व्यक्तीवर,समाजावर आणि देशावर होऊ शकतो. इंटरनेटवरुन काही अनैतिक माहिती प्राप्त करणे व त्यानुसार मानवी वर्तन करणे,सिनेमा,दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमाद्वारे मनोरंजनाशिवाय अनावश्यक माहिती प्राप्त करणे आणि त्याद्वारे विध्वसंक कृत्य करणे अशा काही वाईट प्रवृत्तीमुळे समाजाला प्रसार माध्यमापासून काही वाईट परिणाम ही सोसावे लागतात पण यात प्रसार माध्यमांना दोष देणे हे योग्य होणार नाही कारण प्रसार माध्यमांची निर्मिती हीच चांगल्या कामासाठी झालेली आहे व तिचा उपयोग मानवाने अयोग्य रितीने केल्यास त्यापासून दुष्परिणाम सोसावा लागणार आहे.)

## १.१ शिक्षणातील प्रसार माध्यमांची भूमिका

मानवी वर्तनातील बदल म्हणजे अध्ययन होय.हा बदल टिकावू स्वरुपाचा,चांगला असतो. व्यक्ती विकास हा शिक्षणातून होत असतो. व्यक्तीमत्वाचा विकास होण्यासाठी शालेय अनुभव कार्यक्रमात विविध साधनांचा उपयोग केला जातो. विविध साधनांपैकीच एक प्रभावी साधन शिक्षणात वापरले जाते ते म्हणजे प्रसार माध्यमे होय.

मात्र जीवनात सर्वच बाजूवर माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीचा परिणाम झाला आहे शिक्षणातही माहिती तंत्रज्ञानाचा वापर फार मोठया प्रमाणात होत आहे. या माहिती तंत्रज्ञानात प्रसार माध्यमे महत्वाची भूमिका पार पाडताना दिसतात. शै. मानसशास्त्राच्या विचारसरणीनुसार प्रभावी अध्ययन होण्यासाठी सराव तंत्राचा वापर होणे आवश्यक आहे. हे सराव तंत्र प्रसार माध्यमाद्वारे विकसित करता येते. संगणकाच्या साह्याने स्वयं अध्ययन

करणे सोयिस्कर होत आहे. शैक्षणिक तंत्रविज्ञानाच्या विचार सरणीनुसार प्रभावी अध्ययन होण्यासाठी शाब्दिक अध्ययन अनुभव देण्याऐवजी दृक-श्राव्य साधनांचा वापर केल्यास विद्यार्थ्यांचे अध्ययन निश्चितपणे प्रभावी होईल आणि या तत्वानुसार शिक्षणात मोठया प्रमाणात दृक-श्राव्य साधनाचा वापर होऊ लागला.

पूर्वीची शिक्षणपध्दती ही शिक्षक केंद्रित होती. शिक्षक अध्यापन करत होते. विद्यार्थी पाठांतर करत होते. ज्ञान आणि कौशल्य मूल्यमापनाच्या उद्दिष्टावर जास्त भर होता पण आकलन,उपयोजन या उद्दिष्टांकडे दुर्लक्ष होत होते. आजच्या शिक्षण पध्दतीत विद्यार्थ्यांचा सर्व अंगानी विकास होणे आवश्यक आहे यासाठी याही मूल्यमापनाच्या उद्दिष्टांकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे म्हणून प्रसार माध्यमांच्या साह्याने जास्तीत जास्त परिणामकारक अध्ययन अनुभूती दिली जात आहे.

जुन्या परंपरागत पध्दती वर्गध्यापनात प्रभावी झाल्या नाहीत . त्या आधुनिक समाजाची गरज पूर्ण करण्यास असमर्थ ठरल्या म्हणूनच शिक्षणात प्रसार माध्यमांनी निर्णायक व महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

थोडक्यात शिक्षणात प्रसार माध्यमांशिवाय शैक्षणिक कार्यात अपूर्णता राहून गेली होती. प्रसार माध्यमांशिवाय अध्ययन-अध्यापन प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही तसेच ज्ञान प्राप्तीची केंद्रे यांचा प्रसार माध्यमांशी येणा-या संपर्काशिवाय शिक्षण होत नाही. यामुळे शिक्षणक्षेत्रात प्रसार माध्यमांना अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले.

## १.२ शिक्षकांसाठी प्रसार माध्यमांची उपयुक्तता

प्रभावी अध्यापन होण्यासाठी अध्यापनात विविध साधनांचा उपयोग केला जातो. सद्य परिस्थितीतील माहिती प्रसार माध्यमांच्या द्वारे शिक्षक माहिती उपलब्ध करतात आणि ती माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचे कार्य शिक्षकाद्वारे होते. म्हणजेच अप्रत्यक्ष रितीने प्रसार माध्यम शैक्षणिक कार्यात उपयुक्त काम पार पाडतात दूरचित्रवाणी अतर्गत

प्रसारीत होणाऱ्या यु. जी. सी. सारख्या कार्यक्रमांचा वापर करून शिक्षक अद्ययावत माहिती प्राप्त करतात.

इंटरनेट, वृत्तपत्रे, मासिके आणि इतर प्रसार माध्यमांच्या द्वारे शिक्षक माहिती प्राप्त करतात. विद्यार्थ्यांना ज्ञान देत असताना प्रत्यक्ष अध्यापनात शिक्षक या साधनांचा वापर करतात. विद्यार्थी या साधनाद्वारे अध्ययन अनुभूती मिळवतात. शिक्षक हा नेहमी विद्यार्थी असतो आणि आजचे शिक्षण हे सद्य परिस्थितीचे ज्ञान दैनंदिन जीवनात कशा रितीने उपयोगात आणावे ह्यासाठी शिक्षकांना प्रसार माध्यमांशिवाय उपयुक्त माहिती दुस-या कोणत्या साधनातून मिळू शकत नाही.

केवळ पाठयपुस्तकाच्या साह्याने अध्यापन करण्याचा विचार पाठीमाघे पडत आहे. शिक्षकाला प्रभावी अध्यापनासाठी इतर शैक्षणिक साधनांचा वापर करणे गरजेचे झाले आहे म्हणून प्रसार माध्यमे ही शिक्षकांना उपयुक्त होत आहेत. शिक्षकांसाठी प्रसार माध्यमांचा वापर पुढील प्रमाणे होत असताना दिसून येतो.

अ) यु. जी. सी. चे कार्यक्रम शिक्षक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवतात व या कार्यक्रमांतर्गतील माहिती विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी शिक्षक मदत करतात.

ब) सद्य परिस्थितीची माहिती वृत्तपत्रे, मासिके रेडिओ, दूरचित्रवाणीच्या साहयाने शिक्षक प्राप्त करतात व ही माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवतात.

क) अध्यापनात शैक्षणिक साधनासाठी वृत्तपत्रातील लेख, तक्ता, मासिकातील लेखांचा संदर्भ, दूरचित्रवाणी संच इत्यादीचा वापर करून अध्यापनाची परिणामकारकता वाढवतात.

ड) शिक्षणातील समस्या जाणून घेण्यासाठी व त्यावरील उपाय शोधण्यासाठी प्रसार माध्यमांचा उपयोग शिक्षक करून घेतात.

इ) अध्यापनातील उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी शिक्षक प्रसार माध्यमांचा वापर

करतात.

वरीलप्रमाणे शिक्षक अध्यापनात प्रसार माध्यमांचा उपयोग करून घेताना दिसतात.

## १.३ अध्ययनार्थीसाठी प्रसार माध्यमांची उपयुक्तता

शिक्षणाचा केंद्रबिंदू हा विद्यार्थी आहे. विद्यार्थ्यांचे अध्ययन प्रभावी झाल्यास शिक्षणातील उद्दिष्टे सफल होतील. विद्यार्थ्यांच्या अध्ययनास उपयुक्त सर्व शैक्षणिक अनुभूती देण्याचे काम शिक्षणात होत आहे. विद्यार्थ्यांना जास्त अध्ययन अनुभूती मिळवण्यासाठी प्रसार माध्यमांचा वापर करणे आवश्यक आहे. केवळ पाठ्यपुस्तक आणि शिक्षकांचे अध्यापन यावर विद्यार्थ्यांना विसंबून राहता येत नाही तर व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी विद्यार्थी जास्तीत जास्त माहिती प्रसार माध्यमांद्वारे मिळवतात. प्रसार माध्यमे हे ही विद्यार्थ्यांच्या अध्ययनास उपयुक्त माहिती देण्याचे कार्य करतात. पुढील प्रमाणे अध्ययनार्थींसाठी उपयुक्त कामे प्रसार माध्यमे करतात.

अ) दुरचित्रवाणी संचाद्वारे अध्ययनार्थी माहिती मिळवतात आणि तिचा उपयोग अध्ययनात करतात.

ब) अभ्यासक्रमातील आशयाचे वृत्तपत्रातून प्रकाशित होणारे साहित्य गोळा करून त्याचा उपयोग अध्ययनात करतात.

क) स्वयंअध्ययनासाठी संगणक ,दूरचित्रवाणी संच, रेडिओच्या माध्यमाद्वारे अध्ययन करतात.

ड) आशय संदर्भ माहिती मिळविण्यासाठी प्रसार माध्यमांचा वापर करतात.

इ) प्रश्नमंजूषा, चित्रकोडे, शब्दकोडे यातून विद्यार्थ्यांची विचारशक्ती,तर्कशक्ती विकसित होत जाते.

## १.४ शालेय व्यवस्थापनासाठी प्रसार माध्यमांची उपयुक्तता :

शैक्षणिक कार्यात व्यवस्थापकाची भूमिका फार महत्वाची असते. उत्तम व्यवस्थापमुळे

उत्तम गुणवत्ता जोपासली जाते. उत्तम गुणवत्ता आणण्यासाठी नवीन विचार प्रणाली, नवीन तंत्रज्ञान याचा स्वीकार करणा-या व्यवस्थापकाची आवश्यकता असते. शिक्षणात प्रसार माध्यम पुढीलप्रमाणे कार्य करू शकते.

अ) प्रसार माध्यमांची साधने शालेय उपक्रमात उपलब्ध करुन देणे

ब) अभ्यासक्रम,शैक्षणिक धोरण याविषयी अदयावत माहिती प्रसार माध्यमाद्वारे एकत्रित करुन त्याचा वापर शिक्षणात करुन घेणे.

क) प्रसार माध्यमांच्या साहाय्याने अध्यापन-अध्ययनाचे कार्य करण्यासाठी शिक्षक-विदयार्थ्यांना उत्तेजित करणे.

## १.५ दैनंदिन जीवनातील सवयी :

मानवी वर्तनात सवयींना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. दैनंदिन जीवनात व्यक्ती आपले वर्तन जास्तीत जास्त गरजांच्या पूर्ततेसाठी घालवत असतो. या वर्तनात खूपसे वर्तन हे सवयीमुळे होत असते. गरज असेल तर त्या दृष्टीने बदलणारे वर्तन हे साहजिक आहे पण कित्येक वेळी गरज न जाणवताही केवळ एखादी कृती सवयीमुळे केली जाते उदा. चहा वारंवार पिणे, बोलताना खांदे उडवायची सवयी ह्या चांगल्याही असतात आणि वाईटही असतात. चांगल्या सवयीमुळे मानवाच्या वर्तनात योग्य बदल होतात. दैनंदिन जीवनात आपण जे काम करतो ती सर्व कामे व्यक्तिच्या आवडीची असतीलच असे नाही पण ही सर्व कामे आपण सवयीने करु शकतो उदा. सकाळी लवकर उठणे,जास्त वेळ झोपणे सर्वांना आवडते पण आपण सवयीनं लवकर उठतो.

मुले आपल्या दैनंदिन व्यवहारात बरीच कामे सवयीने करतात उदा. लवकर उठणे, गृहपाठ करणे, शाळेची बॅग आवरणे, वेळेवर जेवण घेणे. सोमवार ते शनिवार शाळेची वेळ होते म्हणून सुरवातीला जाणीवपूर्वक केलेली कामे हळू हळू सवयीने सुरळीत पार पाडली जातात. म्हणून दैनंदिन जीवनात सवयींना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. अशा

दैनंदिन जीवनातील इतर सवयी असतात तशाच दैनंदिन जीवनातील महत्वाचा एक घटक म्हणजे 'अभ्यास ' होय. रोज रोज अभ्यास केल्याने अध्ययनार्थीच्या शैक्षणिक कार्यात निश्चित प्रगती होते म्हणून अभ्यास करण्यासाठी 'अभ्यासाची सवय' लागणे आवश्यक आहे.

## १.६ अध्ययनार्थीच्या दैनंदिन जीवनातील अभ्यास सवयी

अध्ययनार्थीच्या अंगी चांगल्या क्षमताचा विकास करणे आवश्यक आहे. या चांगल्या क्षमता पैकी 'स्वयं अध्ययन' ही एक चांगली परिणामकारक क्षमता आहे. ही क्षमता विकसित होण्यासाठी 'अभ्यास सवयी' ( Study Habit) यांना महत्व आहे. अभ्यास ठराविक वेळ, सातत्यपूर्ण शांत वातावरणात करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे स्वास्थ्य उत्तम राहण्यासाठी वेळच्या वेळी जेवण घेणे. विश्रांती घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सातत्य असेल तर शारिरीक स्वास्थ्य उत्तम राहू शकते, तसेच शैक्षणिक कार्य व्यवस्थित होण्यासाठी ठराविक वेळेला, सातत्यपूर्ण अभ्यासाचे कार्य करणे आवश्यक आहे आणि हे कार्य अभ्यासाच्या सवयीने करता येते.

शाळेला जाण्यापूर्वी दैनंदिन जीवनातील आवश्यक कामे केल्यानंतर अभ्यासासाठी वेळ देणे व शाळेतून आल्यानंतर शाळेमध्ये शैक्षणिक कार्याविषयी चिंतन करण्यासाठी ठराविक वेळ दिल्याने शैक्षणिक कार्य व्यवस्थितरितीने पार पाडले जाते. अशा पध्दतीची कार्ये ही अभ्यासाच्या सवयीने प्राप्त होतात.

## १.७ अभ्यास सवयीची वैशिष्टये

अभ्यासाची सवय ही अध्ययनार्थींच्या दृष्टीने एक महत्वपूर्ण क्षमता आहे. अभ्यास सवयींच्या संदर्भात विविध घटक महत्वपूर्ण काम करतात. अभ्यासाच्या सवयींची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

## १.८ प्रस्तुत संशोधनाची गरज

सद्य परिस्थितीत अध्ययन अध्यापनात शैक्षणिक तंत्रविज्ञानाची आवश्यकता आहे. शैक्षणिक तंत्रविज्ञानाच्या उपयोगाने शिक्षणाची व्याप्ती वाढलेली आहे. शिक्षणात, प्रसार माध्यमे ही महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. प्रसार माध्यमांचा वाढता प्रभाव सर्वच क्षेत्रात जाणवू लागला आहे. शिक्षणातही प्रसार माध्यमांचा उपयोग करणे आवश्यक आहे.

प्रसार माध्यमाबरोबर शैक्षणिक गुणवत्तेत पडणारा फरक याविषयी माहिती घेण्याच्या विज्ञानाने संशोधन कार्यात सुरूवात केली आहे. तसेच शिक्षणात विद्यार्थ्यांचे अध्ययन हा ही एक महत्वाचा मुद्दा आहे. विद्यार्थी अध्ययन कसे करतात. परिणामकारक अध्ययनासाठी असणारी आवश्यक साधने कोणती हा प्रश्न संशोधन करण्यापूर्वी जाणवू लागला म्हणून प्रसार माध्यमे अभ्यास सवयी आणि शैक्षणिक गुणवत्ता यांचा संबंध पहाण्यासाठी शैक्षणिक संशोधनाचे कार्य हाती घेतले.

छात्राध्यापकांनी संदर्भ साहित्याचा वापर करून अध्यापनाची परिणामकारकता वाढविणे आवश्यक आहे. पण छात्राध्यापक कितपत प्रसार माध्यमांशी संपर्कात येतात व त्याचा संबंध शैक्षणिक गुणवत्तेत कसा होतो या विषयी गरज वाटू लागली व त्यामुळे संशोधन कार्य होणे गरजेचे झाले.

प्रस्तुत संशोधनातून छात्राध्यापक की जे भविष्यात शिक्षक होणार आहेत, प्रसार माध्यमांचा अध्ययनात व अध्यापनात कसा उपयोग करून घेता येईल व चांगल्या अभ्यास सवयी विद्यार्थ्यांच्यात कशा विकसित करता येईल. तसेच विद्यार्थ्यांची आवड प्रेरणा काम करण्याची सवय यामध्ये सुधारणा करण्याकरीता तसेच शैक्षणिक गुणवतेमध्ये चांगला दर्जा प्राप्त होण्यासाठी आणि शिक्षणातील अडथळे दूर करण्यासाठी कसा उपयोग करून घेता येईल आणि चांगल्या अभ्यास सवयी छात्राध्यापकांच्यात कशा विकसित करता येतील. याचा बोध घेण्यासाठी प्रस्तूत संशोधनाची गरज जाणवली व यामुळे संशोधन कार्याची

उपयुक्तता दिसून आली.

## १.९ संशोधन समस्येचे शब्दांकन

'प्रसार माध्यमांशी संपर्क आणि अभ्यास सवयी यांचा छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादनाशी संबंध' एक अभ्यास.

## १.१०. प्रस्तुत संशोधन विषयातील संज्ञांचे स्पष्टीकरण

**प्रसार माध्यम :** – करमणूक करणे, विविध विषयांवर अचूक माहिती देणे, विविध मुद्यांवर विविध प्रकारचे दृष्टीकोन व्यक्त करण्याच्या उद्देशाने अनेक व्यक्तींशी संपर्क संबंध प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य ज्या साधनात असते त्याला प्रसार माध्यम असे म्हणतात. प्रस्तुत संशोधनात दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे, मासिके या प्रसार माध्यमांचा विचार केला आहे.

**संपर्क – छात्राद्यापकांशी येणारा संबंध**

प्रस्तुत संशोधनात संपर्क म्हणजे छात्राध्यापकांचा प्रसार माध्यांमाशी येणारा संबंध

**अभ्यास सवयी :** छात्राद्यापकांच्या अभ्यासाच्या संदर्भातील सवयी. संशोधनातील अभ्यास सवयीत अभ्यासाला दिलेला वेळ, वाचन, टिपणे तयार करणे,पाठांतर, परीक्षेची तयारी करणे इत्यादीचा समावेश आहे.

**छात्राध्यापक :** शिक्षक होण्याच्या उद्देशाने प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी प्रस्तुत संशोधनात शिवाजी विद्यापीठांतर्गत २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये प्रशिक्षण घेत असलेले विद्यार्थी.

**शैक्षणिक संपादन :** विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेली एखादी गोष्ट प्रस्तुत संकल्पना येथे छात्राध्यापकांनी प्राप्त केलेल्या गुणासंबंधी घेतलेली आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकांनी (बी. एड.) वार्षिक परीक्षेत सर्व विषयात मिळविलेले सरासरी गुण.

प्रस्तुत संशोधनात २०००-२००१ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक परीक्षेतील सर्व

विषयातील सरासरी गुण घेतले आहेत.

एक अभ्यास – समस्येच्या काळजीपूर्वक शोध.

## १.११ संशोधनाचे महत्व:

सद्य परिस्थिती अध्ययन अध्यापनात शैक्षणिक तंत्रविज्ञानाची आवश्यकता आहे. शैक्षणिक तंत्रविज्ञानाच्या वापरामुळे शिक्षणाची व्याप्ती वाढलेली आहे.प्रसार माध्यमाचाही वाढता प्रभाव सर्वच क्षेत्रात जाणवू लागला आहे. शिक्षणातही प्रसार माध्यमांचा उपयोग करणे आवश्यक आहे. शिक्षणातही प्रसार माध्यमांचा उपयोग करणे आवश्यक आहे. दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे, मासिके यासारख्या प्रसार माध्यमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकास दिवसेदिवस होत आहे.

वेगवेगळ्या प्रसार माध्यमां पैकी दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमांतून करमणूकीचे कार्यक्रम, खेळाचे कार्यक्रम, प्रश्न मंजूषासारखे कार्यक्रम, संस्कृतीचे संवर्धन करणारे कार्यक्रम, देश विदेशांची माहिती देणारे कार्यक्रम, प्राण्यांविषयी सखोल माहिती देणारे कार्यक्रम प्रसारीत होतात. या कार्यक्रमांतून मिळणाऱ्या माहितीच्या शिक्षणातील अभ्यासक्रमाशी ज्या वेळी संबंध येतो त्या वेळी प्रसार माध्यमाव्दारे विद्यार्थी योग्य प्रकारची माहिती प्राप्त करू शकतो. दूरचित्रवाणी तरूण पिढीला सामाजिक व सांस्कृतिक वारसाचा परिचय करून देतो. ह्या दृष्टिने हे संपर्कसाधन समाजिक करणाचे महत्त्वाचे साधन आहे. तसेच वृत्तपत्रे व मासिके ही विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालतात.

अभ्यासक्रमातील अभ्यास विषयासंबंधी मीहती ही प्रसार माध्यमाव्दारे उपलब्ध होत असते. या माहितीचा वापर विद्यार्थी शिक्षणात करू शकतात की ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक संपादनेत गुणात्मक विकास दिसून येईल.

प्रस्तुत संशोधनातून छात्राध्यापक की जे भविष्यात शिक्षक होणार आहेत, त्यांना महत्त्वपूर्ण माहिती मिळू शकेल.प्रसार माध्यमांचा स्वत:च्या अध्ययनात व अध्यापनात कसा

उपयोग करून घेता येईल व चांगल्या अभ्यास सवयी विद्यार्थ्यांच्यात कशा विकसित करता येईल. तसेच विद्यार्थ्यांची आवड, प्रेरणा काम करण्याची सवय यामध्ये सुधारणा करण्याकरीता तसेच चांगल्या दर्जाचे प्राप्त होण्यासाठी तसेच त्यांच्यातील अडथळे दूर करण्यासाठी कसा उपयोग करून घेता येईल व चांगल्या अभ्यास सवयी विद्यार्थ्यांच्यात कशा विकसीत करता येईल याचा बोध प्रस्तुत संशोधनातून मिळेल विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठीचे नवनवीन मार्ग यातून दृष्टिस पडतील.

## १.१२ संशोधन विषयाची उद्दिष्टे :

१ छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीप्रमाणे वर्गवारी करणं.

२ छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणी या प्रसार माध्यामांना दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

३ छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमांवरील प्रसारीत कार्यक्रमांना दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

४ छात्राध्यापकांनी वृत्तपत्रे या प्रसार माध्यमांना दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

५ छात्राध्यापकांनी वृत्तपत्रे या प्रसार माध्यमातील विशेष बातमी वाचण्याकरीता दिलेल्या वेळेचे आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

६.छात्राध्यापकांना मासिक या प्रसार माध्यमासाठी दिलेल्या वेळेचे आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

७. छात्राध्यापकांनी मासिक या प्रसार माध्यमातील विविध लेख वाचण्यासाठी दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

८.छात्राध्यापकानी अभ्यास सवयींना दिलेल्या वेळेचा आणि शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे

९. छात्राध्यापकांनी विविध क्लृप्त्या, गृहपाठ,वाचन,परीक्षेसाठी दिलेला वेळ व शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

१०. प्रसार माध्यमांचा व चांगल्या अभ्यास सवयीचा उपयोग करून शैक्षणिक संपादणूक वाढवण्यासाठीचे उपाय सुचीवणे.

## १.१३ संशोधनाची गृहितके :

१. छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्यात दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम पहाण्याच्या आवडी वेगवेगळ्या असतात.

२. छात्राध्यापक व छात्राध्यापिक यांच्यात वर्तमान पत्रातील विशेष बातमी वाचण्याच्या आवडी वेगवेगळ्या असतात.

३. छात्राध्यापक व छात्राध्यापिक मासिकातील लेख विविध वाचण्याच्या आवडी वेगवेगळ्या असतात.

४.छात्राध्यापक प्रसार माध्यमांतून कमी अधिक ज्ञान ग्रहण करतात.

५.प्रत्येक छात्राध्यापक प्राविण्य मिळविण्यासाठी अभ्यास करतो.

६. प्रत्येक छात्राध्यापकाच्या अभ्यास सवयी वेगळ्या असतात.

## १.१४ परिकल्पना

१. प्रसार माध्यमाचा संपर्क यांचा छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीशी संबंध असतो.

२. अभ्यास सवयींचा छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीशी संबंध असतो.

## १.१५ संशोधन विषयाच्या मर्यादा

१. प्रस्तुत संशोधन हे वृत्तपत्रे, मासिके आणि दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमापुरते मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधनात म. न. पलसाने यांची अभ्यास सवयी प्रश्नावली सन २०००-२००१ च्या छात्राध्यापकांच्या कांही सवयींशी मर्यादित आहे.

१. अभ्यासाला दिलेला वेळ

२. वाचन

३. टिपणे तयार करणे

४. पाठांतर

५. परीक्षेची तयारी

प्रस्तुत संशोधन हे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील मराठी माध्यमाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाशी (बी.एड.) संबंधित आहे.

**१.१६.प्रकरणीकरण:-**

प्रस्तुत संशोधनाचे पुढील प्रमाणे प्रकरणीकरण केले आहे.

**प्रकरण पहिले: प्रास्ताविक**

प्रस्ताविकाच्या पहिल्या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी तसेच संशोधन समस्येचे शिर्षक, संज्ञाचे स्पष्टीकरण, गृहितके,परिकल्पना, उद्दिष्टे,मर्यादा संशोधन अभ्यासाची गरज व महत्त्व सांगितले.

**प्रकरण दुसरे**

**प्रसार माध्यमे व अभ्यास सवयी**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन समस्येशी संबंधित जी प्रसार माध्यमें दूरचित्रवाणी, वर्तमानपत्रे प्रसार माध्यमे व अभ्यास सवयीचे महत्त्व याविषयी विवेचन केलेले आहे.

**प्रकरण तिसरे**

**संबंधित साहित्याचा आढावा**

या प्रकरणात दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमाशी संबंधित संशोधन साहित्याचा आढावा

घेतला आहे.

**प्रकरण चौथे**

**संशोधनाची कार्यपध्दती**

या प्रकरणात संशोधनासाठी वापरलेली पध्दती, आभिकल्प,सामग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने व तंत्रे, नमुना निवड व सांख्यिकीची माहिती दिली आहे.

**प्रकरण पाचवे**

**संशोधन सामग्रीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन**

या प्रकरणात जमा केलेल्या सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन कसे केले आहे या संबंधीचा उहापोह केलेला आहे.

**प्रकरण सहावे**

**सारांश, निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी तसेच पुढील अभ्यासासाठी उहापोह केला आहे.

**१.१७ समारोप**

सदर प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी, गरज, संशोधन समस्या, महत्त्व, उद्दिष्टे, गृहितके, परिकल्पना, मर्यादा, प्रकरणीकरण यांचा उहापोह केला आहे.

पुढील प्रकरणात प्रस्तुत संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे.